INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# 'मार्कंडा पर्यटन स्थळ : एक अभ्यास'

प्रा. डॉ. प्रशांत विनायक बुराडे
भूगोल विभाग प्रमुख
डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय कोंढा- कोसरा
ता.- पवनी जिल्हा.- भंडारा
मोबाईल नंबर 9423117889
Email : prashantvburade@gmail.com

**सारांश :-**

गडचिरोली जिल्हा हा नैसर्गिक विविधतेने व सौंदर्याने नटलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यात अनेक महत्त्वाचे पर्यटन स्थळे आहेत.हे पर्यटन स्थळे ऐतिहासिक, नैसर्गिक, सामाजिक, धार्मिक व इतर अनेक प्रकारची आहेत. जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळांमध्ये मार्कंडा पर्यटन स्थळाला विशेष महत्त्व आहे. परंतु शासन व इतर शासकीय विभागाने या पर्यटन स्थळाकडे दुर्लक्ष केलेले आहे.त्यामुळे हा पर्यटन स्थळ विकसित होऊ शकला नाही. या पर्यटन स्थळामध्ये काळानुसार मोठी पडझड झालेली आहे. तसेच पूरातत्व विभागाने या पर्यटन स्थळाकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे हा पर्यटन स्थळ मागासलेला आहे.प्रस्तुत शोध निबंध मध्ये मार्कंडा पर्यटन स्थळाचा अभ्यास करण्याचा व त्याच्या गुणविशेषाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

Keyword : मार्कंडा पर्यटन स्थळ


**प्रस्तावना :-**

मानव हा सामाजिक प्राणी आहे. मानवाच्या अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा आहेत. या मूलभूत गरजा पूर्ण करण्याकरिता मानव सतत प्रयत्न व कार्य करीत असतो. या मूलभूत गरजा पूर्ण करताना मानव जे श्रम करतो त्यामुळे त्याला मानसिक व शारीरिक थकवा येत असतो.त्यामुळे तो आपला शारीरिक व

मानसिक थकवा दूर करण्याकरिता विविध प्रकारच्या उपाययोजना करीत असतो. त्यामध्ये मुख्यतः एखाद्या मनोरंजनाचा कार्यक्रम पाहणे किंवा करणे,कुटुंबासोबत वेळ घालविणे तसेच एखाद्या नैसर्गिक, धार्मिक किंवा एखाद्या पर्यटन स्थळाला भेट देणे या प्रकारचे उपाय करीत असतो. तसेच मानव हा ईश्वराची शक्ती मानणारा प्राणी आहे. तो एखाद्या संकटाच्या वेळी किंवा आनंदाच्या प्रसंगी दैवी शक्तीला शरण जात असतो. त्यामुळे एखाद्या नदीकिनारी,पर्वतीय प्रदेशात किंवा योग्य ठिकाण पाहून त्या ठिकाणी देवालय किंवा धार्मिक स्थळे बांधून त्यांचा विकास करीत असतो व पुढे अनेक नागरिक किंवा भक्त (पर्यटक )विविध प्रसंगी त्या स्थळांना भेट देत असतात.

यासारख्या उपाययोजनांमुळे एखाद्या स्थळी असणाऱ्या वैशिष्ट्यांमुळे त्या ठिकाणी पर्यटन स्थळाचा विकास होऊ लागला. त्यातूनच भारतामध्ये किंवा जगामध्ये पर्यटनाचा विकास होऊ लागला. या पर्यटनच्या विकास व वाढीमुळे त्या स्थळातील नागरिकांना आर्थिक उत्पन्न मिळू लागले तसेच शासनाला कराच्या स्वरूपात आर्थिक उत्पन्न मिळू लागले.त्यामुळे शासन सुद्धा वैशिष्ट्यपूर्ण स्थळांचा विकास करू लागला व जास्तीत जास्त पर्यटकांनी त्या स्थळाला भेट द्यावी याकरिता विविध प्रसार माध्यमातून जाहिरात करू लागला. आज संपूर्ण भारत व जगामध्ये पर्यटन हा व्यवसाय विकसित आले आहे. अनेक देश पर्यटन स्थळाच्या विकासात करिता व परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्याकरिता मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करीत आहेत. तसेच पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे पर्यटन व्यवसायाला सहाय्यक अनेक उद्योगांचा विकास सुद्धा होत आहे.

**अभ्यासक्षेत्र:-**



26 ऑगस्ट 1982 साली आकाराने मोठा असलेल्या महाराष्ट्र शासनाने दोन भागात ...डचिरोली जिल्ह्याची निर्मिती ...ाना महाराष्ट्र शासनाने वैनगंगा नदीला ...र मानून विभागणी केली. वैनगंगा नदीच्या पूर्वेला

गडचिरोली जिल्हा तर पश्चिमेला चंद्रपूर जिल्हा तयार करण्यात आला. या गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यांमध्ये मार्कंडा हे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. हे

स्थळ चामोर्शी तालुका स्थळापासून 11 किलोमीटर अंतरावर तर गडचिरोली जिल्हा केंद्रापासून 40 किलोमीटर अंतरावर आहे.

मार्कंडा पर्यटन स्थळाचे अक्षवृत्तीय स्थान 20° 19' 31" उत्तर व रेखावृत्तीय स्थान 79. 57' मिनिट 22" सेकंद पूर्व असा आहे. या पर्यटन स्थळाच्या वायव्येला फराळा गाव, उत्तर ते पूर्वेला वैनगंगा नदी, दक्षिणेला शंकरपूर गाव, नैऋत्येला खोकुर्डी गाव बसलेले आहे. हे अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक स्थळ असून गडचिरोली जिल्ह्यातील एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून याची ख्याती आहे. हे स्थळ वैनगंगा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर वसलेले आहे.

उद्देश:- मार्कंडा पर्यटन स्थळाचा अभ्यास करणे.

**अभ्यासपद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंध हा पूर्णतः प्राथमिक व द्वितीयक माहितीवर आधारित असून या संशोधनाकरिता या स्थळाला प्रत्यक्ष भेट दिलेली आहे. तसेच विविध मासिके, वृत्तपत्रे,अहवाल, शोधनिबंध, विविध शासकीय -निमशासकीय कार्यालयातील आकडेवारी ( माहितीचे) संकलन करण्यात आलेले आहे व मिळालेल्या माहितीचे योग्य पद्धतीने मांडणी करून त्यावरून विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**मार्कंडा पर्यटन स्थळ :**

चामोर्शी तालुक्यातील मार्कंडा हे एक अतिशय महत्त्वाचे व प्राचीन पर्यटन स्थळ आहे. येथे मार्कंडादेव मंदिर समूह आहे. हे मंदिर समूह सर्वप्रथम इसवी सन 1893 मध्ये बर्निंगहॅमने प्रकाशित आणले. बर्निंगहॅम यांच्या मते येथे एकूण 24 मंदिराचा समूह आहे परंतु आज फक्त 18 मंदिर अस्तित्वात असून 6मंदिराचा

केवळ पायवा (पायाभाग ) शिल्लक आहे. त्या मंदिर समूहातील शिल्प व स्थापत्य अतिशय सुरेख व अनमोल आहेत. हा मंदिर समूह पूर्व-पश्चिम 118 फूट व उत्तर दक्षिण 196 फूट क्षेत्रात विस्तारित आहे. या मंदिर समूहामध्ये अनेक मंदिरे आहेत ते पुढील प्रमाणे.

**मार्कंडेश्वर ऋषी मंदिर :-**

या मंदिर समूहातील हे अतिशय सुंदर व आकर्षक मंदिर आहे. हे मंदिर इ.स. दहाव्या ते अकराव्या शतकात चालुक्य काळात बांधण्यात आलेले आहे. याचा आकार 73' 7" x 55'3" असा आहे.. या मंदिराचे बांधकाम वालुका पाषाणांमध्ये केलेले आहे. या मंदिरामध्ये चतुरस्त, अयत्तस्त, गर्भगृह आणि तीन प्रवेशद्वार युक्त सभामंडप आहे. यासोबतच हे मंदिर पायव्यापासून शिखरापर्यंत सुंदर नक्षी,कमानी व वेलबुटीने सजविलेले आहे. या मंदिराच्या शिखराकडे जाणाऱ्या कोण रेषा निमुळत्या झालेल्या आहेत. मंदिराच्या गाभाऱ्यात शिवलिंग आहे. गाभाऱ्याची भिंत त्रिजंगायुक्त मंडोवराची आहे. मंडोवरावर शिल्पयुक्त तीन पट्टीका आहेत.भिंती अस्त्रस व रथकांनी युक्त आहेत. प्रत्येक रथाकावर देव-देवतांच्या व सुरसुंदरीच्या प्रतिमा आहेत. या मंदिराच्या सभा मंडपाच्या मध्ये शिवाचे वाहन नंदीची स्थापना केलेली आहे येथील हत्ती, घोडेस्वार यांच्या प्रतिमा मूळे या मंदिराचे सौंदर्य अधिक खुलून दिसते.येथील स्तंभ कलाकूसर युक्त आहेत.

येथील गर्भगृहाचे शिखर अतिशय आकर्षक आहे. सध्या या शिखराचा काही भाग पडक्या स्थितीत आहे. या शिखरावरिल मुर्त्या अतिशय आकर्षक आहेत. येथे पक्षी, नर्तकी, फुले, हत्ती, घोडे, युद्धप्रसंग इ. चित्र व प्रसंग कोरलेले आहेत. या मंदिराचा सर्वात महत्त्वाचा व आकर्षक भाग हा त्यांचा मंडोवर आहे. यामध्ये तीन स्तरांमध्ये वेगवेगळे शिल्प कोरलेले आहेत. येथे प्रामुख्याने शिव,ब्रह्म- सरस्वती, विष्णू -लक्ष्मी,शिवपार्वती यांच्यासह अनेक देवदेवतांच्या विविध रूपाच्या मुर्त्या आहेत.येथे एकूण 409 मूर्ती आहेत.

**यमधर्म मंदिर :-**

Received: 03-03-2026 | Accepted: 08-04-2026 | Published: 16-04-2026 | www.ijeml.com

हे मंदिर मार्कंडेश्वर मंदिराच्या उत्तरेस आहे. या मंदिराचा आकार 14 '9"x10' 0" इतका आहे.हे मंदिर गर्भगृह व अंतराळ या द्विदलिय विधानात आहे. या मंदिराला सुद्धा सभा मंडप असावे परंतु काळानुरूप ते नष्ट झालेले असावे. हे मंदिर पश्चिम मुखी असून पूर्व, उत्तर व दक्षिण बाजू भिंतींनी बंद केलेले आहेत. हा मंदिर शिखराकडे निमुळता होत गेलेला आहे. गर्भगृहात शिवलिंग व नंदीची स्थापना केलेली आहे. या मंदिराचे प्रवेशद्वार सुंदर नक्षीकाम केलेले आहे. मंदिराच्या दोन्ही बाजूच्या उठावामधील भिंतीस्तंभ अतिशय आकर्षक आहेत. मंदिराचा पायाभाग चौकोनी व त्यावरील माथा अष्टकोनी स्वरूपाचा आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजू मुर्त्यांनी आकर्षित सजविलेले आहेत. येथील मुर्त्यांमध्ये हत्तीवर हल्ला करणारे शादूलाची रूपके कोरली आहेत.मंदिराच्या दर्शनी भागावर शुकनाश असून ते पुष्पपट्टीका चौकटीने सजविले आहेत. मंदिराच्या तिन्ही भिंतीचा बाह्यभाग नक्षीकाम केलेला आहे.

**मृकुंडऋषीं :-**

हे या मंदिर समूहातील दुसरे मोठे मंदिर आहे. हे मंदिर मार्कंडेश्वर ऋषींच्या वडिलांच्या स्मरणात बांधले असावे. हे मंदिर पूर्वमुखी असून मार्कंडेश्वर ऋषीच्या मंदिराच्या पश्चिम -उत्तर दिशेला आहे.या मंदिराचा आकार 36'3" x 27'6"असा आहे.या मंदिराच्या गर्भगृहामध्ये शिवलिंगाची व नंदीची स्थापना करण्यात आलेली आहे. हे मंदिर द्विदलीय आहे. या मंदिरात गर्भगृह,अंतराळ व सभागृह अशी स्थापना आहे. मंदिराचे गर्भगृह चौकोनी आहे व त्याचे बाह्यांग नक्षीकाम केलेले आहे.गर्भगृहाचे प्रवेशद्वारावर सुंदर असे नक्षीकाम केलेले आहे. गर्भगृहाच्या बाहेरील भिंतींवर चामुंडा, सूर्य व गजासुरवध या मुर्त्या कोरलेल्या आहेत. अंतराळामध्ये शिवपार्वती व गणेश यांच्या मुर्त्या आहेत. येथील अर्धस्तंभ साध्या पद्धतीचा असून त्यावर पूर्ण घट रूपके कोरलेली आहेत. या मंदिराचा सभामंडप 8.30 x 7.30 मिटर आकाराचा आहे. येथील स्तंभ चौकशी असून काही भाग गोलाकार व माथा मेहेर युक्त आहे. येथील चारही स्तंभावर अतिशय सुंदर नक्षीकाम केलेले आहे.

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

**विठ्ठल रुक्मिणी मंदिर :-**

हे मंदिर मुख्य मंदिराच्या उत्तर- पूर्वेस असून पूर्वमुखी आहे. या मंदिराचा आकार लहान आहे. या मंदिरांमधील भिंतीवर नृत्य गणेश,सूर्य व भैरवाचे शिल्प आहे. या मंदिराच्या गर्भगृहात सूर्यमुर्तीची स्थापना केलेली आहे.

**मृत्युंजय मंदिर:-**

हे मंदिर विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या उत्तरेस आहे. या मंदिराचा आकार 18'2" x 6'10" आहे. या मंदिराच्या गर्भगृहात शिवलिंगाची व नंदीची स्थापना केलेली आहे.मंदिराचा पदविन्यास द्विदलीय गर्भगृह आणि अंतराळ या रचनेतील आहे. अंतराळाचे प्रवेशद्वार त्रिशाखायुक्त अलंकृत आहे. यावर मानवी शिल्प,पक्षी कोरलेले आहेत. मंदिराच्या गर्भगृहाचे नविनिकरण करण्यात आलेले आहे.मंदिराच्या मागील भिंतीवर शिवपार्वतीचे शिल्प कोरलेले आहे. मंदिराचे छत कमल पुष्पांनी कोरलेले आहे.

**उमा-महेश्वर मंदिर :-**

हे मंदिर मुख्य मंदिराच्या पश्चिमेला आहे. या मंदिराचा आकार 16'0" x 10'0" आहे.येथे शिवलिंगाची व नंदीची स्थापना करण्यात आलेली आहे. गर्भगृहामध्ये शिवलिंग व शिवपार्वतीची आलिंगन मुद्रेतील शिल्प आहेत. मंदिराच्या बाह्यांग भागांमध्ये उत्तरेला चामुंडा,पश्चिमेला सूर्य व दक्षिणेला अंधकासुरवध या मुर्त्या आहेत.

**दशावतार मंदिर:-**

हे मंदिर मंदिर समूहाच्या पश्चिमेकडील तटबंदीला लागून बांधलेले आहे.या मंदिराचा आकार 79'0" x 10'0" आहे. या मंदिराच्या मागच्या भिंतीत लहान -लहान 12 देवळया आहेत. तेथे विविध देवतांचे शिल्प आहेत.

**शक्ती देवी मंदिर :-**

Received: 03-03-2026 | Accepted: 08-04-2026 | Published: 16-04-2026 | www.ijeml.com

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

हे मंदिर अतिशय लहान आकाराचे आहे. हे मंदिर दशावतार मंदिराच्या दक्षिण बाजूस आहे. हया मंदिराचे शिखर मनोऱ्यासारखे आहे. येथे महिषासुर मर्दानीची मूर्ती स्थापन केलेली आहे.

**गणेश मंदिर:-**

हे मंदिर 10'0" x 710" आकाराचे लहान मंदिर आहे. या मंदिराला गर्भगृह व मंडप आहे. या मंदिराचे नवीनीकरण करण्यात आलेले आहे.मंदिराच्या गर्भगृहात गणेशाची मूर्ती आहे.

**शंकर मंदिर:-**

हे मंदिर यमधर्म मंदिराप्रमाणेच आहे हे मंदिर मुख्य मंदिराच्या दक्षिण पश्चिम दिशेला आहे. या मंदिराच्या बाह्यभागावरील अनेक मुर्त्यां अंशतः झिजलेल्या आहेत. येथील देवकुष्टामध्ये चामुंडा, सूर्य, गजासुरवध मुर्त्या आहेत.

**विश्वेश्वर मंदिर:-**

हे मंदिर दक्षिण बाजूकडील परकोटाला लागून आहे. हे मंदिर गर्भगृह,अंतराळ व मंडप या रचनेतील आहे. या मंदिराचा आकार 14'6" x 14'6" आहे. गर्भगृहात शिवलिंगाची स्थापना करण्यात आलेली आहे. मंडपाच्या स्तंभावर शिव व भैरवाच्या मुर्त्या कोरलेल्या आहेत.

**भीमसेन मंदिर :-**

हे मंदिर चौकोनी आकाराचे असून येथे शिवलिंगाची स्थापना केलेली आहे.

**वीरेश्वर मंदिर:-**

हे मंदिर चौकोनी आकाराचे आहे. येथे शिवलिंगाची स्थापना करण्यात आलेली आहे. हे मंदिर मुख्य मंदिराच्या दक्षिणेस आहे.

**मार्कंडा पर्यटन स्थळाची वैशिष्ट्ये :-**

* नैसर्गिक सौंदर्य असलेले पर्यटन स्थळ आहे.

Received: 03-03-2026 | Accepted: 08-04-2026 | Published: 16-04-2026 | www.ijeml.com

* उत्कृष्ट स्थापत्य  कलेचा नमुना असणारे हे पर्यटन स्थळ आहे.
* ऐतिहासिक पार्श्वभूमी असणारे हे स्थळ आहे.
* वाहतुकीची सुगमता असणारे हे स्थळ आहे.
* धार्मिक घटक असणारे हे स्थळ आहे.
* या पर्यटन स्थळाच्या जवळपास इतर अनेक पर्यटन स्थळे आहेत.
* या पर्यटन स्थळाजवळ अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

**निष्कर्ष:**

मार्कंडा हे गडचिरोली जिल्ह्यातील अतिशय महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. अतिशय सुंदर स्थापत्य कलेचा उत्कृष्ट उदाहरण असणारे पर्यटन स्थळ आहे. वैनगंगा नदी किनारा लागून असल्यामुळे या पर्यटन स्थळाचे धार्मिक महत्त्व अजून वाढते. हे पर्यटन स्थळ अतिशय प्राचीन असल्यामुळे काळानुरूप या पर्यटन स्थळांमध्ये मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे. परंतु शासन किंवा निमशासकीय यंत्रणांचे या पर्यटन स्थळाकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. त्यांनी या पर्यटन स्थळाच्या विकासाकडे पाहिजे तसे लक्ष दिलेले नाही. त्यामुळे हे पर्यटन स्थळ आज इतर पर्यटन स्थळाच्या तुलनेने मागे पडत आहे.तसेच या पर्यटन स्थळाच्या जीर्णोद्धाराकडे पाहिजे तसे शासनाचे लक्ष नाही. शासनाने जर या पर्यटन स्थळाकडे विशेष लक्ष दिले तर हे पर्यटन स्थळ जागतिक दर्जाचे होऊ शकते.

**संदर्भग्रंथ:-**

*  अ. ज. राजूरकर,चंद्रपूरचा इतिहास, महाकाली प्रकाशन (1956 )
* डॉ.नलिनी टेंभेकर,पूर्व विदर्भातील प्रेक्षणीय व ऐतिहासिक स्थळे,पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्यूटर नागपूर
* डॉ. विठ्ठल घारपुरे, पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर नागपूर( 2010 )
* चांदा  डिस्ट्रिक्ट गॅजेटियर (2005 )
* गडचिरोली जिल्हा आर्थिक व सामाजिक समलोचन( 2024 )

* डॉ. र. रा.बोरकर, चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्याचे पुरातत्व सुयश प्रकाशन नागपूर (2009)

* डॉ. रघुनाथ बोरकर,मध्ययुगीन विदर्भाचा इतिहास, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर( 2015 )

* डॉ.सुरेश मिश्र, डॉ.प्रभाकर गद्रे, चांदा का गोंड राज्य, राजकमल प्रकाशन प्रा. लि. (2008)

* डॉ. मनोहर नरांजे,प्रस्तरात गोठलेली वैदर्भीय संस्कृती, सुधीर प्रकाशन वर्धा (2025 )